॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# North Maharashtra University, Jalgaon
# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

'A' Grade
(NAAC Re-Accredited)
3rd Cycle

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१
दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

## Public Relations Office जनसंपर्क विभाग

जळगाव दि. २१ ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाची पीएच.डी प्रवेशपूर्व परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व प्रवेशपूर्व परीक्षेतून सूट प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शक निश्चितीच्या प्रक्रियेला आज २१ मे पासून सुरळीत प्रारंभ झाला. पहिल्या दिवशी ४०५ विद्यार्थ्यांना मार्गदर्शक प्राप्त झाले.

विद्यापीठाची पीएच.डी प्रवेशपूर्व परीक्षा सप्टेंबर, २०१७ मध्ये घेण्यात आली होती. या परीक्षेतील उत्तीर्ण आणि सूट प्राप्त झालेले विद्यार्थी तसेच २०१४ मध्ये प्रवेशपूर्व परीक्षा उत्तीर्ण झालेल्या मात्र मार्गदर्शक प्राप्त न झालेल्या विद्यार्थ्यांसाठी आज दि. २१ मे पासून मार्गदर्शक निश्चितीची प्रक्रिया सुरु करण्यात आली. पहिल्या दिवशी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, मानव्य विद्याशाखा या दोन विद्याशाखांमधील पुढील विषयांना मार्गदर्शक देण्यात आले. उपस्थित असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शक प्राप्त झाले. कंसामध्ये मार्गदर्शक देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या नमूद करण्यात आली आहे. हिंदी (२०), उर्दू (०१), मराठी (३०), इंग्रजी (३५), संस्कृत (०१), पर्यावरणशास्त्र (०५), भूगोल (११), जिऑलॉजी (०२), मेकॅनिकल इंजि.(५३), इलेक्ट्रॉनिक्स इंजि. (३०), सिव्हील इंजि. (२०), केमिकल इंजि.(०८), इन्स्ट्रयूमेंटेशन इंजि.(१३), इलेक्ट्रीकल इंजि. (०६), औषधीनिर्माणशास्त्र (१०३), बायोकेमेस्ट्री (०२), बायोटेक्नालाजी (०२), मायक्रोबायोलॉजी (०५), बॉटनी (११), झुलॉजी (११), कॉम्प्युटर इंजि.(३३)

रसायन तंत्रज्ञान संस्था, भाषा अध्ययन व संशोधन केंद्र, संगणकशास्त्र प्रशाळा, पर्यावरणशास्त्र प्रशाळा, जैवशास्त्र प्रशाळा या ठिकाणी ही प्रक्रिया राबविण्यात आली. या सर्व प्रशाळांना प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर यांनी भेटी देवून प्रक्रियेची माहिती घेतली व येणाऱ्या अडचणींचे निराकरण केले. या सर्व प्रशाळांमध्ये विद्यार्थ्यांची बसण्याची उत्तम व्यवस्था विद्यापीठाच्या वतीने करण्यात आली होती. कोणत्याही प्रकारचा त्रास न होता सुलभपणे ही प्रक्रिया होत असल्याची प्रतिक्रिया विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. संचालक प्रा.बी.व्ही.पवार, प्रा.एस.टी.इंगळे, प्रा.व्ही.एल.माहेश्वरी, प्रा.जितेंद्र नाईक, प्रा.म.सु.पगारे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशाळांमधील प्राध्यापक, संलग्नित महाविद्यालयातील तज्ज्ञ व अनुभवी मार्गदर्शक, संशोधन विभागातील सर्व अधिकारी-कर्मचारी यांनी या प्रक्रियेसाठी सहकार्य केले. २४ मे पर्यंत ही प्रक्रिया सुरु राहणार असून उद्या २२ मे रोजी मानव्य विद्याशाखा (समाजशास्त्र, समाजकार्य, राज्यशास्त्र, मानसशास्त्र, अर्थशास्त्र, संरक्षणशास्त्र, इतिहास, तत्त्वज्ञ ाान आणि विधी) विज्ञान व तंत्रज्ञान या विद्याशाखांमधील (रसायनशास्त्रातील सर्व विषय) विषयांची प्रक्रिया राबविली जाणार आहे. विद्यार्थ्यांनी मार्गदर्शकाचे संमतीपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे. तसेच परिपत्रकात नमूद केलेली सर्व मुळ कागदपत्रे व या कागदपत्रांच्या छायांकित प्रतींचा एक संच सोबत ठेवावा असे आवाहन संशोधन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

---

जा.क्र. : उमवि/१६/हस्तदेय/२०१८ दिनांक : २१ मे, २०१८

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
( डॉ.सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी